# तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा सविस्तर तपशिल.

## सेवा करार पद्धतीने विवक्षीत कामांसाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/ 13 मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई, 400032 दिनांक.17/12/2016 अनुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गातील जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांची खालील प्रमाणे कंत्राटी पध्दतीवर या मंडळ कार्यालय व मंडळांतर्गत अधिनस्त विभागीय कार्यालयामध्ये विवक्षीत कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

| अ.क्र | संवर्ग | पद संख्या |
|---|---|---|
| 1 | शाखा अभियंता / सहा अभि श्रे- 2 | १० |

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी धुळे व नाशिक जिल्हयातील सिंचन व बांधकाम तसेच अनुषंगीक (विवक्षीत प्रकल्पाशी संबंधीत सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन व प्रकल्प अहवाल तयार करणे) इ. प्रकाराचे ज्ञान व पुरेसा व धुळे व नंदुरबार जिल्हयात जलसंपदा विभागातील सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ धुळे यांच्याकडे <u>दिनांक ०५.०२.२०२०</u> (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) प्राप्त होईल याप्रमाणे पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावेत. अर्जाचे पाकीटावर "सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नांव लिहण्यांत यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही. सदर नेमणूका समितीद्वारे मुलाखती घेऊन करण्यांत येतील. सदर नेमणूकांचे आदेश हे शासनाच्या अंतीम मान्यतेनंतर निर्गमीत करण्यांत येतील.

<u>कंत्राटी पध्दतीवर भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे</u>

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| (1) | शाखा अभियंता/ सहा.अभियंता श्रेणी २ | तापी खो-याचा एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करणे, नर्मदा खो-यातील पाणी तापीत वळविणे व उकाई धरणातील महाराष्ट्र राज्याच्या संभाव्य पाणी उपलब्धते नुसार तेथे उपसा सिंचन योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करणे, पार गिरणा उपसा योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करणे, पार गिरणा उपसा योजनांचे प्रकल्प अहवाल तयार करणे, तापी वरील २२ उपसा सिंचन योजनांचे काम करून घेणे, पांझरा प्रकल्पाची C.A.D.W.M. | शाखा अभियंता/ सहा.अभियंता श्रेणी २ |

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | यी कामे धरणाचे सांडव्या वरुन वाहून जाणा-या पाण्याचा जलशास्त्रीय अभ्यास करुन पाणी उपलब्धतेच्या मर्यादेत कालवा वाढ व विस्तार इ.कामाचे प्रस्ताव सादर करणे तसेच नंदुरबार जि.तील सरदार सरोवर प्रकल्पाचे भुसंपादन व प्रकल्प बाधीतांचे पुनर्वसन व वेळोवेळी सोपविलेली इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी तसेच अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांनी वेळोवेळी सोपविलेली अनुषंगिक व इतर विवक्षीत कामकाज करणे.' | |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट https://wrd.maharashtra.gov.in चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती अधीक्षक अभियंता; धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे या कार्यालयात उपलब्ध आहे.

**<u>सदर नेमणूका या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.</u>**

१. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या पदाचा विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूक अकरा महिन्यासाठीच राहील. त्यापेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई 400032 दिनांक.17/12/2016 मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यांत यावा.

५. करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात येणा-या (व्यक्ती) अधिकारी त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

६. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.

७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूणक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रु.१००/-च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक राहील.

कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

१०. सदर अधिकारी/कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.

११. अशा अधिकारी / कर्मचारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३. अशा करार पद्धतीवरील अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती,कामांबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१४. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१५.अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडुन प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे, आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यांत यावे.

१६. क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बाधील राहणार नाही.

१७. अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१८. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१९. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यांत येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे यांच्या सुचना फलकावर दिनांक ६.१.२०२० रोजी प्रसिध्द करण्यांत येईल. व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यांत येईल तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ई-मेलवर कळविण्यांत येईल.

२०.सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर संबंधीत विवक्षीत कामासाठी करण्यांत येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

२१.करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांस/कर्मचा-यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२२.उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन/नियुक्ती अधिकारी/कर्मचारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

## जलसंपदा विभागातील सेवा करार पद्धतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अभियंता / यांची नेमणूक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज.

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता
धुळे पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
सिचंन भवन, साक्री रोड, धुळे.

| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वतःचे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

अर्ज केलेल्या पदाचे नाव :- उप अभियंता/सहा.अभि.श्रेणी-2/शाखा अभियंता

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | कायमचा पत्ता | |
| ३ | दुरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) | |
| ४ | ई-मेल (अनिवार्य) | |
| ५ | सध्याचा पत्ता | |
| ६ | जन्मतारीख | |
| ७ | राष्ट्रीयत्व | |
| ८ | प्रवर्ग | |
| ९ | लिंग | |
| १० | अवगत भाषा | |
| ११ | शैक्षणिक माहिती | |

१२ अनुभव -

| अ. क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |

१३ :- सेवानिवृत्तीचा दिनांक -

१४ :- सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल-

मला पुर्णपणे माहिती आहे की; पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार प्रध्दतीने विवक्षित कामासाठी उप अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-2 /शाखा अभियंता या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहिरातीत नमुद विविक्षीत कामासाठीच असून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी आहे. कामाच्या निकडीनुसार धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशिल सत्य व अचुक आहे यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणिव आहे.

ठिकाण-

अर्जदाराची नाव व सही

दिनांक-